Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

लोकमातेच्या स्मृतिदिनानिमित्त महात्मा फुले हायस्कूलमध्ये अभिवादन!

(पान २ वर)



। शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक १२७ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

### Selected

## बांगलादेशचा बलाढ्य ऑस्ट्रेलियाला दणका

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश यांच्यात पहिली कसोटी 13 ऑगस्टपासून सुर आहे. या कसोटीच्या पहिल्या दिवशी क्रिकेट चाहत्यांना त्यांनी कधीच विचार केला नसेल असं चित्र पाहायला मिळालं. बांगलादेशच्या वेगवान गोलंदाजांच्या समोर ऑस्ट्रेलियाची मजबूत मानली जाणारी फलंदाजी गडगडली. ऑस्ट्रेलियाचा पूर्म संघ पहिल्या डावात 198 धावा करु शकला. तर, पहिल्या दिवशील बांगलादेशनं पहिल्या डावात 1 बाद 96 धावा केल्या. बांगलादेशचे तंजीद हसन नाबाद 32 धावा आणि मोमिनुल हक नाबाद 35 करत मैदानावर आहेत. मिशेल स्टार्कनं एक विकेट घेतली, शादमान इस्लाम 20 धावा करुन बाद झाला. ऑस्ट्रेलिया सहा महिन्यानंतर कसोटी सामना खेळत आहे. मारारा क्रिकेट ग्राऊंडवर सुरु असलेल्या सामन्यातील पहिल्या दिवशी बांगलादेशनं वर्चस्व गाजवलं.

### कागदपत्रे आणि वारंवार नोंदणीच्या कटकटीतून नागरिकांची सुटका

# महाआयडीच्या माध्यमातून सरकारी सेवांचा मार्ग होणार सुकर!

## आधारशी संलग्न एकात्मिक डिजिटल ओळखीद्वारे सेवा मिळण्याची शक्यता

**मुंबई | प्रतिनिधी :** नागरिकांना विविध शासकीय योजनांचा आणि सेवांचा लाभ घेताना वारंवार कागदपत्रे सादर करण्याची तसेच प्रत्येक विभागात स्वतंत्र नोंदणी करण्याची कटकट लवकरच कमी होण्याची शक्यता आहे. माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञेचा (AI) प्रभावी वापर करून नागरिकांना घरबसल्या जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारकडून 'महा-आयडी' या एकात्मिक डिजिटल ओळख व्यवस्थेचा उपक्रम राबविण्याची तयारी सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व शासकीय विभागांना माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञेचा वापर करून नागरिकांना अधिकाधिक सेवा बसल्या जागी उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून प्रत्येक नागरिकाला आधारचा समावेश असलेला डिजिटल 'महा-आयडी' क्रमांक देण्याची संकल्पना पुढे आली आहे. हा स्वतंत्र ओळख क्रमांक नसून आधारशी संलग्न डिजिटल ओळख व्यवस्था असणार आहे.

या व्यवस्थेमुळे नागरिकांना विविध शासकीय विभागांमध्ये सेवा, योजना, अनुदान किंवा प्रमाणपत्रांसाठी अर्ज करताना एकाच प्रकारची माहिती आणि कागदपत्रे वारंवार सादर करण्याची आवश्यकता कमी होणार आहे. सरकारकडे आधीच उपलब्ध असलेली अधिवास, उत्पन्न, शिधापत्रिका तसेच अन्य संबंधित माहिती पात्र सेवांसाठी प्रमाणीकरणानंतर पुन्हा वापरता




येणार आहे.

### विद्यार्थ्यांपासून शेतकऱ्यांपर्यंत फायदा

सध्या विविध शिष्यवृत्तींसाठी विद्यार्थ्यांना स्वतंत्र पोर्टलवर नोंदणी करावी लागते. शेतकऱ्यांना अनुदान किंवा योजनांसाठी ओळख, जमीन आणि बँक खात्याची माहिती पुन्हा पुन्हा द्यावी लागते. सामाजिक कल्याण योजनांच्या लाभार्थ्यांनाही विविध विभागांकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पुन्हा सादर करावी लागतात. महाआयडी व्यवस्थेमुळे ही प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. याचा लाभ विद्यार्थी, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला उद्योजक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना विशेषतः होण्याची अपेक्षा आहे. विविध सरकारी विभागांशी व्यवहार करताना अनेक युजरनेम, पासवर्ड आणि स्वतंत्र नोंदणीची गरजही कमी होऊ शकते.

### 'महासारथी'द्वारे विभागांचे एकत्रीकरण

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञा विभागाच्या 'महासारथी' प्लॅटफॉर्मद्वारे या उपक्रमाची अंमलबजावणी करण्याचे नियोजन आहे. नागरिकांनी संबंधित पोर्टलवर नोंदणी करून आवश्यक माहिती दिल्यानंतर आधारचा समावेश असलेला डिजिटल महा-आयडी क्रमांक उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या क्रमांकाच्या आधारे पात्र शासकीय सेवांसाठी अर्ज करता येणार असून, प्रमाणीकरण झालेली माहिती पुन्हा पुन्हा मागविण्याऐवजी तिचा पुनर्वापर केला जाणार आहे. दरम्यान, या उपक्रमाबाबत स्वातंत्र्यदिनी मुख्यमंत्री सूतोवाच करण्याची शक्यता असून, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि सविस्तर घोषणा लवकरच होण्याची अपेक्षा आहे. डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून नागरिकांचा वेळ, श्रम आणि कागदपत्रांचा खर्च वाचविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरू शकतो.

### महा-आयडीमुळे काय बदलणार?

सरकारी सेवांसाठी एकच डिजिटल ओळख; कागदपत्रांच्या वारंवार सादरीकरणातून नागरिकांची सुटका होण्याची शक्यता

**महा-आयडी म्हणजे काय?**

आधारशी संलग्न असलेली एकात्मिक डिजिटल ओळख व्यवस्था. विविध शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ घेताना नागरिकांची ओळख व पात्रतेशी संबंधित माहिती सुलभपणे वापरता येणार आहे.

**नागरिकांना काय फायदा?**

प्रत्येक विभागात स्वतंत्र नोंदणीची गरज कमी होणार.
तीच कागदपत्रे वारंवार सादर करण्याची कटकट कमी होणार.
अनेक युजरनेम व पासवर्ड लक्षात ठेवण्याची गरज कमी होणार.
घरबसल्या विविध शासकीय सेवांसाठी अर्ज करणे अधिक सुलभ होणार.
सरकारकडे उपलब्ध माहितीचा पात्र सेवांसाठी पुनर्वापर करता येणार.

# ८० व्या स्वातंत्र्यदिनाची जय्यत तयारी; लाल किल्ल्यावर उत्साह शिगेला

## पथसंचलन आणि सुरक्षा व्यवस्थेची तयारी अंतिम टप्प्यात; लाल किल्ला परिसरात उत्साहाचे वातावरण

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | (प्रतिनिधी):** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त राजधानी नवी दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्यावर जय्यत तयारी सुरू झाली आहे. स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून विविध व्यवस्था अंतिम टप्प्यात आणण्यात येत असून, संपूर्ण परिसरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. ध्वजारोहणाची तयारी अंतिम टप्प्यात लाल किल्ल्याच्या प्रांगणात राष्ट्रध्वज फडकविण्याची तयारी पूर्णत्वाकडे जात आहे. सोहळ्यासाठी आवश्यक व्यासपीठ, परिसराची सजावट तसेच इतर व्यवस्थांची कामे वेगाने सुरू आहेत. सुरक्षा दलांकडून पथसंचलनाचा सराव स्वातंत्र्यदिन सोहळ्यात सहभागी



होणाऱ्या विविध सुरक्षा दलांकडून शिस्तबद्ध पथसंचलन आणि परेडचा सराव करण्यात येत आहे. सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणांकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. लाल किल्ला परिसरात देशभक्तीचा उत्साह स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या तयारीदरम्यान लाल किल्ला परिसरात नागरिकांचीही मोठी उपस्थिती पाहायला मिळत आहे. आकर्षक सजावटीसह 'भारत' असा उल्लेख असलेल्या विविध रचनांमुळे परिसराला देशभक्तीचा रंग चढला आहे. ऐतिहासिक सोहळा सुरळीत आणि सुरक्षितपणे पार पडावा यासाठी प्रशासनाकडून कडेकोट सुरक्षा व्यवस्था तसेच अन्य आवश्यक तयारी करण्यात येत आहे. स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून विविध व्यवस्था अंतिम टप्प्यात आणण्यात येत असून, संपूर्ण परिसरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# इसरणे येथे आदिवासी दिन

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** ग्रामपंचायत इसरणे येथील वीर एकलव्य नगर येथे ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने भगवान वीर एकलव्य यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच समाजातील विविध क्रांतिवीरांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. जागतिक आदिवासी दिनानिमित्त संपूर्ण गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.परंपरा आणि क्रांतिवीरांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले.मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमास आदिवासी टायगर सेना महाराष्ट्र राज्य सचिव ॲड. प्रविण मोरे, बंटीदादा वाघ (वीर एकलव्य प्रतिष्ठान, धुळे शहर), गोविंदाभाऊ अहिरे (धुळे तालुकाध्यक्ष, ATS), गुरु ठाकरे, शंकरभाऊ मोरे, नितीनभाऊ सोनवणे, अनिल ठाकरे, कालू ठाकरे, आप्पा सोनवणे, सुनील मोरे, अमोल मोरे, ओंकार मोरे, सुपडू मोरे, अंबर सोनवणे, सतीश सोनवणे, आकाश सोनवणे, दत्तू मोरे, पांडू मोरे, विनोद मोरे, आकाश मोरे, समाधान मोरे, प्रकाश अहिरे, जंगलू अहिरे, विकास मोरे, परमेश्वर मोरे, संतोष मोरे, खंडू मोरे, प्रवीण मोरे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाकिस्तान भारतावर अणुबॉम्ब हल्ला करणार

**नवी दिल्ली :भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर एका प्रसिद्ध भू-राजकीय तज्ज्ञाच्या दाव्यामुळे जागतिक स्तरावर नव्या चर्चेला उधाण आले आहे. चीनमध्ये जन्मलेले कॅनेडियन प्राध्यापक आणि जिओपॉलिटिक्सचे जाणकार जिआंग ज्युक्विन (Jiang Xueqin) यांनी असा दावा केला आहे की, भविष्यात जर युद्ध किंवा मोठा संघर्ष उद्भवला, तर पाकिस्तान सर्वात आधी अण्वस्त्रांचा वापर करू शकतो. प्राध्यापक ज्युक्विन यांनी यापूर्वी केलेल्या अनेक राजकीय भविष्यवाण्या हुबेहूब खऱ्या ठरल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या या ताज्या विधानाची जागतिक माध्यमांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे.**

# लोकसभेत संपूर्ण 'वंदे मातरम्'चे गायन!

## संसदेचे कामकाज अनिश्चित काळासाठी स्थगित

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** संसदेच्या अधिवेशनादरम्यान लोकसभेत आज महत्त्वाची राजकीय घडामोड पाहायला मिळाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत लोकसभेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी सभागृहात संपूर्ण 'वंदे मातरम्'चे गायन करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून 'वंदे मातरम्'च्या संपूर्ण गायनावरून राजकीय वर्तुळात चर्चा आणि वाद सुरू होता. या पार्श्वभूमीवर लोकसभेत संपूर्ण गीताचे गायन झाल्याने या घडामोडीला विशेष



महत्त्व प्राप्त झाले आहे. गायनानंतर लोकसभेचे कामकाज स्थगित 'वंदे मातरम्'चे गायन पूर्ण झाल्यानंतर काही वेळातच लोकसभेचे कामकाज अनिश्चित काळासाठी (Sine Die) स्थगित करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. या घडामोडीमुळे संसदेच्या सद्य अधिवेशनाची सांगता झाली असून, 'वंदे मातरम्'च्या संपूर्ण गायनावरून सुरू असलेल्या राजकीय चर्चेला पुन्हा एकदा उधाण येण्याची शक्यता आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# देवाच्या पैशांवरच भाजपचं लक्ष

## आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल, मोर्चासाठी नाशिककरांना आवाहन

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी:** अयोध्येतील श्रीराम मंदिरातील कथित चंदाचोरीप्रमाणेच सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ३५ हजार कोटी रुपयांच्या कामांतही घोटाळा झाल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी गुरुवारी केला. 'मंदिरातील दानपेटी आणि सिंहस्थ कुंभमेळ्यातून पैसे काढण्यावरच भाजपचे लक्ष आहे,' असा हल्लाबोल त्यांनी केला. सिंहस्थ कामांची श्वेतपत्रिका काढण्याची मागणी करत, सत्ताधारी आमदार आणि नगरसेवकांना रस्त्यावर थांबवून 'आमचे पैसे कुठे गेले?' असा जाब विचारावा, असे आवाहनही त्यांनी नाशिककरांना केले.

### नाशिकमध्ये बनावट नोटांचा कारखाना उद्ध्वस्त



'सिंहस्थ कामांचे पैसे कोणाच्या खिशात गेले? देशात चंदाचोरीवर प्रश्न विचारला, की लगेच हिंदूविरोधी ठरवले जाते. राम मंदिरासाठी आम्हीही दान दिले, लोकांनीही दान दिले; मग प्रश्न विचारायचा नाही का?' असा सवाल ठाकरे यांनी केला. भाजप साधू-महंतांचा निवडणुकीत वापर करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला. 'हा निर्णय प्रशासकीय नसून राजकीय आहे. त्यामुळे या सर्व कामांची श्वेतपत्रिका काढली पाहिजे,' अशी मागणी ठाकरे यांनी केली. शहरातील खड्डे आणि सिंहस्थ कामांच्या मुद्द्यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष तर्फे सोमवारी, १७ ऑगस्टला मोर्चा काढण्यात येणार आहे. 'हा मोर्चा ताकदीचा असेल. नाशिककरांनी विचारधारा बाजूला ठेवून नाशिककर म्हणून एकत्र यावे आणि मोर्चात सहभागी व्हावे,' असे आवाहनही आदित्य ठाकरे यांनी यावेळी बोलताना केले.

### भाजप मोठा मासा

कुंभमेळा कामांतील कथित बनावट कार्यारंभ आदेशांच्या मुद्द्यावरूनही ठाकरे यांनी 'बनावट कंत्राटदारांचे आदेश काढणारे छोटे मासे आहेत; भाजप हा मोठा मासा असून शहर गिळायला निघाला आहे,' असा आरोप केला. मुंबईत मुख्यमंत्री आपल्या मित्रांना जमीन देत असल्याचा आरोप करीत, भाजपच्या एका आमदाराला १६ एकर जमीन देण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. भाजपच्या एका आमदाराच्या साखर कारखान्याला १८ कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आल्याचा आरोप करीत, 'स्पेशल केस म्हणून मुख्यमंत्र्यांनी नाशिकला निधी द्यावा,' अशी मागणी ठाकरे यांनी केली. मुंबई-नाशिक महामार्गामुळे लॉजिस्टिक वाढेल, उद्योगांना चालना मिळेल, अशी अपेक्षा होती; मात्र चार वर्षांत परिस्थिती सुधारण्याऐवजी खड्डेच वाढले, असा आरोप ठाकरे यांनी केला.



# बोरविहीर येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त विद्यार्थ्यांना वही-पेन वाटप!

## आदिवासी पंच मंडळाचा उपक्रम; शिक्षणातून प्रगती साधण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी :** धुळे तालुक्यातील ग्रामपंचायत बोरविहीर येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेत ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त समस्त आदिवासी पंच मंडळ, बोरविहीर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वही व पेनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची सुरुवात आदिवासी क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा, जयपालसिंग मुंडा, तंट्यामामा भील आणि खाज्या नाईक यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करत अभिवादनाने करण्यात आली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिवासी टायगर सेना, महाराष्ट्र राज्य सचिव अ‍ॅड. प्रविण मोरे होते. यावेळी किरण (आण्णा) ठाकरे (सरपंच, बोरविहीर), गोविंदाभाऊ अहिरे (धुळे तालुकाध्यक्ष, ATS), दादाबाबा सोनवणे (बिरसा क्रांती दल, धुळे शहर), शुभमभाऊ ठाकरे, गोविंदाभाऊ माळी, अनिलभाऊ पवार, रामभाऊ सोनवणे, रामदास सोनवणे सर, शामदादा सोनवणे, प्रतापदादा माळी, राजेंद्रदादा ठाकरे, सुनीलभाऊ वाघ, विक्की ठाकरे, उमेश पवार, आकाश मोरे, गोविंदा माळी, समाधान अहिरे, दिनेश गायकवाड, मयूर माळी, रवी माळी, सागर मोरे, निलेश माळी, चेतन माळी, ऋतिक अहिरे, भटूभाऊ ढमढेरे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रांतिवीरांच्या कार्याचा जागर यावेळी अ‍ॅड. प्रविण मोरे, गोविंदाभाऊ अहिरे आणि रामदास सोनवणे सर यांनी समाजबांधवांना महापुरुष व क्रांतिवीरांच्या कार्याची माहिती देत त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. शिक्षण हे सामाजिक व आर्थिक प्रगतीचे प्रभावी माध्यम असून, विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास, वाचन व लेखनाची सवय लावून आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी, असे मार्गदर्शन मान्यवरांनी केले. आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहनही करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. आदिवासी दिन केवळ उत्सव म्हणून साजरा न करता शिक्षण, आरोग्य, संस्कृती आणि सामाजिक विकासाला चालना देणारे उपक्रम राबविणे आवश्यक असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

समस्त आदिवासी पंच मंडळाच्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळाले असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याचा सकारात्मक उपक्रम राबविण्यात आला.

# सारोळा शाळेतील ५९ गुणवंत विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्यदिनी गौरव

जन सम्राट टाईम्स

**जामखेड | प्रतिनिधी:** "गुणवंत विद्यार्थी हेच भारताचे उज्ज्वल भविष्य आहे," या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळा येथील माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष तथा उद्योजक भीमराव गोविंदराव सांगळे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनासाठी ११ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता चौथी, पाचवी, सातवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा तसेच NMMS परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या तब्बल ५९ गुणवंत विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर गौरव करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे. दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन भीमराव सांगळे यांच्या वतीने दरवर्षी स्वातंत्र्यदिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांसाठी ११ हजार रुपयांचे बक्षीस दिले जाते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठीही त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांनी यापूर्वी शाळेसाठी १ लाख २ हजार ६०१ रुपयांची देणगी देऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे. विद्यार्थ्यांना मिळणार प्रेरणा सारोळा शाळेच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी सातत्याने मदतीचा हात देणाऱ्या सांगळे यांच्या दातृत्वाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अधिक मेहनत घेऊन शैक्षणिक यश संपादन करण्याची प्रेरणा निर्माण होत आहे. या दातृत्वाबद्दल सरपंच रितूताई काशीद, अजयदादा काशीद, उपसरपंच हर्षद मुळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश मुळे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगदाळे, ग्रेड मुख्याध्यापक संदीप भालसिंग, सर्व शिक्षक, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी यांच्या वतीने भीमराव सांगळे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# तहसील कार्यालयाचा 'AC' कारभार चव्हाट्यावर!

## AC बसविण्यात नियमांचेपालन झाले?

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी:** भुसावळ तहसील कार्यालयातील वातानुकूलित (AC) यंत्रणेच्या खर्चावरून आणि ती बसविताना प्रशासकीय नियमांचे पालन झाले आहे का, यावरून आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. माहितीच्या अधिकारातून (RTI) मागविण्यात आलेल्या माहितीत अनेक महत्त्वाचे मुद्दे स्पष्ट झाले नसल्याचा आरोप अर्जदार प्रमोद जगन्नाथ पाटील यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे प्रथम अपील दाखल केले आहे.

**कोणत्या मुद्द्यांवर मागविली माहिती?**

प्रमोद पाटील यांनी तहसील कार्यालयातील AC यंत्रणेबाबत विविध बाबींची माहिती मागविली होती. त्यामध्ये कोणत्या दालनांमध्ये AC बसविण्यात आले आहेत, संबंधित अधिकाऱ्यांचा Pay Matrix Level काय आहे, AC बसविण्यासाठी शासनाच्या नियमानुसार आवश्यक पात्रता पूर्ण होते का, तसेच AC खरेदीसाठी कोणत्या बजेट हेडमधून निधी खर्च करण्यात आला, यासारख्या बाबींचा समावेश आहे. याशिवाय AC यंत्रणेमुळे मागील दोन वर्षांत वीज वापर व वीज बिलात झालेली वाढ, तसेच AC बसविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची (PWD) तांत्रिक मंजुरी घेण्यात आली होती का, याचीही माहिती मागविण्यात आली होती. मिळालेली माहिती अपूर्ण असल्याचा आरोप तहसील कार्यालयाकडून काही माहिती उपलब्ध करून देण्यात आली असली, तरी मागविलेल्या सर्व मुद्द्यांची समाधानकारक व स्पष्ट माहिती मिळाली नसल्याचा दावा अर्जदाराने केला आहे. त्यामुळे AC यंत्रणा बसविताना शासनाच्या नियमांचे पालन झाले आहे का आणि त्यासाठी करण्यात आलेला खर्च नियमानुसार आहे का, याबाबत आता प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्राचा संदर्भ देत या प्रकरणातील कागदपत्रे उपलब्ध असल्याचेही अर्जदाराने नमूद केले आहे.

**प्रथम अपिलातून संपूर्ण माहितीची मागणी**

जन माहिती अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या अपूर्ण माहितीनंतर प्रमोद पाटील यांनी आता प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. प्रथम अपिलात मागविलेली संपूर्ण माहिती स्पष्ट स्वरूपात आणि नियमानुसार विनाशुल्क उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शासकीय कार्यालयांमध्ये वातानुकूलित यंत्रणा बसविताना लागू असलेल्या नियमांचे पालन झाले आहे का, निधीचा वापर योग्य पद्धतीने झाला आहे का आणि तांत्रिक मंजुरी घेण्यात आली होती का, या प्रश्नांची उत्तरे प्रथम अपिलाच्या निर्णयातून समोर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे भुसावळ तहसील कार्यालयाकडून या प्रकरणी काय स्पष्टीकरण दिले जाते, याकडे आता लक्ष लागले आहे.

# लोकमातेच्या स्मृतिदिनानिमित्त महात्मा फुले हायस्कूलमध्ये अभिवादन!

## माळी समाज सुधारणा पंचमंडळाकडून ३१०० रुपयांचा धनादेश

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव शहरातील सुवर्ण महोत्सवी महात्मा फुले हायस्कूल येथे लोकमाता राजमाता माँसाहेब अहिल्यामाई होळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून गणवेशाचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पी. डी. पाटील यांनी केले.



अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार होते. यावेळी संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त संत सावता माळी समाज सुधारणा पंचमंडळ, मोठा माळीवाडा यांच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी ३१०० रुपयांचा धनादेश मुख्याध्यापक जे. एस. पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. तसेच शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका एम. के. कापडणे यांचे चिरंजीव, जळगाव येथील अभियंता व शाळेचे माजी विद्यार्थी नितीश कापडणे यांच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना ५ गणवेशांचे वितरण करण्यात आले. अहिल्यामाईंच्या कार्याचा विद्यार्थ्यांना परिचय यावेळी एस. व्ही. आढावे व पी. डी. पाटील यांनी पुण्यश्लोक अहिल्यामाई होळकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या योजना, पाणवठे, विहिरी, मंदिरे, घाट तसेच त्यांची युद्धनीती व युद्धकौशल्य याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

लोककल्याणकारी कार्यामुळेच अहिल्यामाई होळकर यांना लोकमाता म्हणून गौरविले जाते, असे त्यांनी सांगितले. मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी होळकर घराण्याचा वारसा तसेच चोंडीच्या कन्येपासून लोकमातेपर्यंतचा अहिल्यामाईंचा प्रेरणादायी प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. संत सावता माळी समाज सुधारणा पंचमंडळाच्या वतीने धनादेश आणि माजी विद्यार्थी नितीश कापडणे यांच्या वतीने गणवेश देण्यात आल्याबद्दल मुख्याध्यापकांनी सर्वांचे आभार मानले. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसून आले. कार्यक्रमाला पंचमंडळाचे अध्यक्ष व्ही. टी. माळी, सचिव आर. डी. महाजन, सल्लागार पंच एच. डी. माळी, पी. डी. पाटील यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन पी. डी. पाटील यांनी केले, तर आभार एच. डी. माळी यांनी मानले.

# दलित वस्तीतील निकृष्ट कामांविरोधात माळेगावच्यानागरिकाचाउपोषणाचाइशारा

## १५ ऑगस्ट रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव| प्रतिनिधी:** सोयगाव तालुक्यातील माळेगाव पिप्री येथील दलित वस्तीतील १५ वा वित्त आयोग तसेच इतर विकासकामांमध्ये भ्रष्टाचार व निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचा आरोप करत शिवराम दगडू जाधव यांनी गटविकास अधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले आहे. संबंधित प्रकरणाची तातडीने चौकशी करून कारवाई न झाल्यास १५ ऑगस्ट २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. शिवराम जाधव यांनी निवेदनात नमूद केले आहे की, त्यांनी १५ जानेवारी २०२६ आणि २७ जुलै २०२६ रोजी संबंधित कामांबाबत तक्रार अर्ज दिले होते. मात्र, अद्याप त्यावर कोणतीही ठोस चौकशी झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी



निकृष्ट काम करणाऱ्या संबंधित ठेकेदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकावे, तसेच करण्यात आलेल्या कामांचे दिलेले पेमेंट नियमानुसार वसूल करावे, अशी मागणी जाधव यांनी केली आहे. याशिवाय सरपंच साधनाबाई रविंद्र परदेशी व ग्रामसेवक पी.बी. गोरे यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी आणि ग्रामसेवकाची तात्काळ बदली करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. अद्याप त्यावर कोणतीही ठोस चौकशी झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.पूर्वीच्या उपोषणानंतरही कार्यवाही नसल्याचा आरोप याच मागण्यांसाठी १० मार्च २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले होते. त्यावेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व जिल्हा परिषद सदस्य यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कायदेशीर कार्यवाही झालेली नसल्याचा दावा शिवराम जाधव यांनी केला आहे. मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचा आरोप माळेगाव येथील दलित वस्तीमध्ये सिमेंट रस्ता, गटार-नाली आणि नळ कनेक्शन यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिसरातही अपेक्षित विकासकामे झालेली नाहीत, असा आरोप करण्यात आला आहे. प्रशासनाने या तक्रारीची तातडीने दखल घेऊन संबंधित कामांची चौकशी करावी व दोषींवर नियमानुसार कारवाई करावी. अन्यथा १५ ऑगस्ट रोजी आमरण उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शिवराम जाधव यांनी दिला आहे.

# मृत्यूनंतरही जगता येणार; नशिराबाद प्राथमिक आरोग्य केंद्राचा अवयवदानाचा महासंकल्प!

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद | ,"आपल्या मृत्यूनंतरही आपले डोळे कोणाला तरी दृष्टी देऊ शकतात, तर आपले अवयव एखाद्याला नवजीवन देऊ शकतात. अवयवदान हे केवळ दान नसून मानवतेला दिलेले जीवनदान आहे," असा संदेश देत प्राथमिक आरोग्य केंद्र, नशिराबाद यांच्या वतीने जागतिक अवयवदान दिनानिमित्त गावात भव्य जनजागृती रॅली काढण्यात आली.



राज्य शासनाच्या 'माझा गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत आयोजित या रॅलीचे नियोजन प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणव भदादे, डॉ. स्नेहा कोलते आणि डॉ. अमन पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या जनजागृती मोहिमेला नशिराबाद गावातील गरोदर माता, स्तनदा माता आणि महिलांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि जनआरोग्य समितीचे सदस्य डॉ. प्रमोद अमोदकर, न्यू इंग्लिश स्कूलचे संचालक श्री. जनार्दन माळी आणि श्री. बंडू खंडारे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य सेवक दीपक तायडे, सुनील ढाके, वासुदेव पाटील, १०२ रुग्णवाहिकेचे चालक राजाराम पचपांडे तसेच परिसरातील सर्व आशा सेविकांनी विशेष परिश्रम घेतले.

# परभणीत जैन गुरुकुलातील विद्यार्थ्यांना इंग्लिश डिक्शनरीचे वाटप

## उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह



जन सम्राट टाईम्स

**परभणी । प्रतिनिधी:** परभणीजवळील नवागड (उखलद) येथील श्री. १००८ नेमिनाथ दिगंबर जैन गुरुकुलात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणारा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषेचे ज्ञान अधिक समृद्ध व्हावे आणि शिक्षणाची गोडी वाढावी, या उद्देशाने डॉ. दिपक महिंद्रकर यांच्या वतीने गुरुकुलातील विद्यार्थ्यांना इंग्लिश डिक्शनरीचे (शब्दकोशाचे) वाटप करण्यात आले. नवीन डिक्शनरी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि नव्या पुस्तकांविषयीची उत्सुकता या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी या शब्दकोशांचा निश्चितच उपयोग होणार आहे. मान्यवरांची उपस्थिती या शैक्षणिक उपक्रमावेळी गुरुकुलचे व्यवस्थापक संदीप हेलसकर, अधीक्षक पार्श्वनाथ शिरसागर यांच्यासह गुरुकुलातील शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. दिपक महिंद्रकर यांच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल गुरुकुल व्यवस्थापन आणि ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले. अशा शैक्षणिक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक साधने उपलब्ध होऊन त्यांच्या शैक्षणिक व बौद्धिक विकासाला चालना मिळते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.परभणीजवळील नवागड (उखलद) येथील श्री. १००८ नेमिनाथ दिगंबर जैन गुरुकुलात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणारा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषेचे ज्ञान अधिक समृद्ध व्हावे आणि शिक्षणाची गोडी वाढावी, या उद्देशाने डॉ. दिपक महिंद्रकर यांच्या वतीने गुरुकुलातील विद्यार्थ्यांना इंग्लिश डिक्शनरीचे (शब्दकोशाचे) वाटप करण्यात आले.

# मतदार याद्यांचे विशेष पुनरीक्षण; 97.14 टक्के मतदारांची कार्यवाही पूर्ण

## १७ ऑगस्टपर्यंत गणना प्रपत्र भरण्याची मुदत; १९.१७ टक्के मतदार 'Uncollectable EF' वर्गात

जन सम्राट टाईम्स

**मुंबई| प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण सुरू असून, या मोहिमेला आता अंतिम टप्पा गाठला आहे. मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्यामार्फत घरोघरी जाऊन गणना प्रपत्र (Enumeration Form) भरून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. दि. १७ ऑगस्ट २०२६ ही प्रपत्र भरून घेण्याची अंतिम मुदत आहे. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या कार्यालयाने



दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील एकूण ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदारांपैकी ९ कोटी ५० लाख ५५ हजार ५९१ मतदारांची (९७.१४ टक्के) कार्यवाही पूर्ण झाली आहे. उर्वरित २७ लाख ९८ हजार ४५८ मतदारांची (२.८६ टक्के) कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. ७७.९७ टक्के मतदारांनी प्रपत्र भरून केले जमा गृहभेटीदरम्यान आतापर्यंत ७ कोटी ६२ लाख ९९ हजार ३६० मतदारांनी (७७.९७ टक्के) गणना प्रपत्र भरून त्यावर स्वाक्षरी करून जमा केले आहे. १.८७ कोटी मतदार 'Uncollectable EF' वर्गात दरम्यान, १ कोटी ८७ लाख ५६ हजार २३१ मतदार (१९.१७ टक्के) विविध कारणांमुळे 'Uncollectable EF' या वर्गात नोंदविण्यात आले आहेत. यामध्ये घरभेटीदरम्यान मतदार उपलब्ध नसणे, कायमस्वरूपी स्थलांतर, मृत्यू किंवा अन्यत्र नोंदणी झाल्याची कारणे प्रामुख्याने आहेत. कारण मतदार १९.१७% राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना याद्या उपलब्ध 'Uncollectable EF' संवर्गातील मतदारांच्या नावांच्या याद्या संबंधित BLO मार्फत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी नियुक्त केलेल्या बूथ लेव्हल एजंट्स (BLA) यांना उपलब्ध करून दिल्या जात आहेत. तसेच संबंधित जिल्ह्यांच्या अधिकृत संकेतस्थळांवरही या याद्या प्रसिद्ध करण्यात येत आहेत. दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना या प्रक्रियेची माहिती देण्यात आली. १७ऑगस्टपर्यंतपडताळणीचीसंधी ज्या मतदारांच्या वास्तव्याबाबत शंका आहे किंवा 'Uncollectable EF' यादीतील मतदारांबाबत संबंधितांकडे माहिती उपलब्ध आहे, त्यांनी १७ ऑगस्टपर्यंत संबंधित BLO कडे माहिती द्यावी, असे आवाहन निवडणूक विभागाने केले आहे. त्यानंतर प्रत्यक्ष पडताळणी करून पात्र मतदारांचे गणना प्रपत्र भरून घेण्यात येणार

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# जिल्हा परिषद शाळा बंद होऊ नयेत; पालकांनी शाळांना साथ द्यावी :बी. व्ही. गायकवाड

## काहुरखेडे जिल्हा परिषद शाळेतील ६५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। प्रतिनिधी:** जिल्हा परिषद शाळा या गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या असून, गावातील पालकांनी आपल्या पाल्यांना जिल्हा परिषद शाळेतच प्रवेश देऊन या शाळा टिकविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन सेवानिवृत्त अकाऊंट ऑफिसर बी. व्ही. गायकवाड यांनी केले. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून उपदेश फाउंडेशन, भुसावळ यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, काहुरखेडे येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी. व्ही. गायकवाड होते. दीपनगर येथील एक्झिक्युटिव्ह इंजिनियर चंद्रकांत सपकाळे यांनी या शैक्षणिक साहित्याचे दातृत्व केले.

६५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य शाळेतील सर्व ६५ विद्यार्थ्यांना दुरेघी, चौकटी, चौरेघी मिक्स वह्या, 'मी वाचणारच' इंग्रजी उजळणी पुस्तक, 'मूलभूत गणित व १ ते १०० संख्या वाचन-लेखन उपक्रम' उजळणी पुस्तक, '१९ खडी मी वाचणारच' उजळणी पुस्तक आदी शैक्षणिक साहित्य देण्यात आले. विद्यार्थ्यांना खाऊचेही वाटप करण्यात आले. यावेळी चंद्रकांत सपकाळे, सुरेंद्र रामटेके, यशराज हंबर्डीकर तसेच उपदेश फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. 'जिल्हा परिषद शाळा गुणवत्तापूर्ण' अध्यक्षीय मार्गदर्शन करताना बी. व्ही. गायकवाड म्हणाले, "जिल्हा परिषद शाळा गुणवत्तापूर्ण आहेत. या शाळांमधील शिक्षक उच्चशिक्षित



असून डी.एड. व बी.एड. पदवीधारक आहेत. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांना जिल्हा परिषद शाळेत प्रवेश द्यावा आणि या शाळा बंद होऊ नयेत यासाठी पुढाकार घ्यावा." जिल्हा परिषद शाळा बंद झाल्यास गोरगरीब, शेतकरी आणि मजूर कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा विपरीत परिणाम होईल. अनेक पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले व्यक्ती जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊन आज उच्च पदांवर कार्यरत आहेत. त्यामुळे या शाळांचे महत्त्व मोठे असल्याचेही त्यांनी नमूद केले. "शैक्षणिक साहित्य वाटपामागे कोणताही स्वार्थ नसून गोरगरीब व गरजू पालकांच्या मुलांनी शिक्षण घ्यावे, शाळेत टिकावे आणि शिक्षणाच्या माध्यमातून उच्च पदांवर पोहोचावे, हाच या उपक्रमाचा उद्देश आहे," असे गायकवाड यांनी स्पष्ट केले. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमास उपदेश फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक शिंदे, उपाध्यक्ष संदेश शिंदे, रेल्वे गार्ड आर. एस. वानखेडे, सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी बी. एस. नरवाडे, रेल्वे तिकीट कंडक्टर सुरेंद्र रामटेके, एमएसईबी साकेगाव ऑपरेटर यशराज हंबर्डीकर, सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी गौतम निकम आदी उपस्थित होते.m कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक समाधान जाधव यांनी केले. प्रास्ताविक संदेश शिंदे यांनी केले, तर आभार मुख्याध्यापिका उज्वला सुरवाडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपशिक्षिका ममता तडवी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, निलेश पाटील, गजानन पाटील, विनोद धनगर, वामन सपकाळे, आकाश पाटील, गोकुळ पाटील, धीरज पाटील तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# बाळकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांची जयंती उत्साहात


जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे लाडके निसर्गकवी बाळकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यांच्या काव्यसृष्टीने अनेक पिढ्यांना निसर्गप्रेम, संवेदनशीलता आणि सौंदर्यदृष्टीची प्रेरणा दिली असून, त्यांची साहित्यसंपदा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अमूल्य ठेवा मानली जाते. निसर्गाच्या सौंदर्याला शब्दांचे रूप बाळकवींच्या कवितांमध्ये निसर्गाचे साधे, सुंदर आणि जिवंत चित्रण आढळते. "आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे" आणि "हिरवे हिरवेगार गालिचे, हरित तृणाच्या मखमलीचे" यांसारख्या काव्यपंक्तींनी आजही वाचकांच्या मनात अढळ स्थान मिळवले आहे. त्यांच्या कवितांमधून निसर्गाशी असलेले अतूट नाते, निरागस भावविश्व आणि मराठी काव्याची समृद्ध परंपरा आजही जिवंत असल्याची भावना साहित्यप्रेमींनी व्यक्त केली. राज्यभर विविध कार्यक्रम बाळकवींच्या जयंतीनिमित्त राज्यातील अनेक शाळा, महाविद्यालये आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये कवितावाचन, काव्यगायन, निबंध स्पर्धा आणि साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्राचे लाडके निसर्गकवी बाळकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बाळकवींच्या साहित्याचा परिचय करून देत त्यांच्या विचारांना उजाळा देण्यात आला. साहित्यप्रेमींकडून विनम्र अभिवादन निसर्गाचे अद्वितीय सौंदर्य शब्दबद्ध करणारे प्रतिभावंत कवी म्हणून बाळकवींचे योगदान आजही मराठी साहित्यविश्वात प्रेरणादायी मानले जाते. त्यांच्या जयंतीनिमित्त साहित्यप्रेमी, शिक्षक, विद्यार्थी आणि विविध सामाजिक-सांस्कृतिक संस्थांकडून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# चौपाटीवरील रस्त्याला पडलेले भगदाड बुजवण्यास सुरुवात!

## ड्रेनेज लाईनसाठी खोदलेला रस्ता खचला



जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी :** पांझरा नदीलगतच्या चौपाटीवरील काँक्रीटच्या रस्त्याला दोन दिवसांपूर्वी पडलेल्या भल्या मोठ्या भगदाडाची दखल घेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून (MJP) रस्ता दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. सोशल मीडियावर व्यक्त होणारे नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, भाजप पदाधिकारी तसेच जागृत पत्रकारांनी हा प्रश्न लावून धरल्यानंतर प्रशासनाने तातडीने कारवाई केली. ड्रेनेज कामासाठी खोदलेला रस्ता वर्षभरातच खचला चौपाटीवरील काँक्रीटचा रस्ता सुमारे दीड वर्षापूर्वी तयार करण्यात आला होता. त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारीतील भूमिगत गटार योजनेच्या कामासाठी संबंधित कंत्राटदाराने चेंबर उभारण्यासाठी रस्ता खोदला होता. मात्र, दुरुस्ती केल्यानंतर अवघ्या वर्षभरातच रस्ता खचल्याने रस्त्याच्या दर्जाबाबत तसेच ड्रेनेज लाईनच्या कामाबाबत प्रश्न उपस्थित झाले. तक्रारीनंतर अभियंत्यांचे तातडीचे आदेश रस्त्याला पडलेल्या भगदाडाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्यानंतर नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह भाजप पदाधिकारी व पत्रकारांनी याबाबत MJPकडे तक्रार केली. त्याची दखल घेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपविभागीय अभियंता एस. आर. पवार यांनी संबंधित गुजरातस्थित कंत्राटदाराला रस्ता तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश दिले. आदेश मिळताच कंत्राटदाराने रस्ता दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.ड्रेनेज कामासाठी खोदलेला रस्ता वर्षभरातच खचला चौपाटीवरील काँक्रीटचा रस्ता सुमारे दीड वर्षापूर्वी तयार करण्यात आला होता. त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारीतील भूमिगत गटार योजनेच्या कामासाठी संबंधित कंत्राटदाराने चेंबर उभारण्यासाठी रस्ता खोदला होता. 'दुरुस्ती नव्हे, दर्जेदार काम करा' दरम्यान, रस्ता पुन्हा खचू नये यासाठी केवळ तात्पुरती डागडुजी न करता दर्जेदार आणि टिकाऊ पद्धतीने दुरुस्तीचे काम करण्यात यावे, अशी मागणी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, भाजप पदाधिकारी आणि जागृत पत्रकारांनी केली आहे. रस्त्याची दुरवस्था वेळेत प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्याबद्दल नागरिकांनी संबंधित सामाजिक कार्यकर्ते, भाजप पदाधिकारी, सोशल मीडियावरील जागरूक नागरिक आणि पत्रकारांचे आभार मानले.

# 'मीराष्ट्रवादीतचराहणार';विरोधकांचा बदनामकरण्याचाकुटीलडाव!

## माजी आमदार फारुख शहांचा दावा

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** "मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच असून, राष्ट्रवादीच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे काम सुरू आहे. माझ्या एमआयएममध्ये जाण्याच्या केवळ अफवा पसरवल्या जात असून, हा विरोधकांचा मला बदनाम करण्याचा कुटील डाव आहे," असा स्पष्ट खुलासा माजी आमदार फारुख शाह यांनी केला. प्रभाग क्रमांक १९ मधील शब्बीर नगर येथे रस्ते कामाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी त्यांनी 'सुशीनाला' येथील अतिक्रमणाच्या प्रश्नावरून काही लोकप्रतिनिधींवर नाव न घेता टीका केली. 'अतिक्रमणाचा प्रश्न सोडविण्यासाठी वर्षभरापासून पाठपुरावा' "सुशीनाला येथील अतिक्रमणाचा प्रश्न थांबविण्यासाठी अजित पवार यांच्या माध्यमातून वर्षभरापासून वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा सुरू केला होता. मात्र, आयुक्तांनी नागरिकांवर अन्याय केला," असा



आरोप फारुख शाह यांनी केला. "या नागरिकांना त्याच ठिकाणी पक्की घरे बांधून देण्याचा प्रयत्न केला जाईल. मात्र, काही लोकप्रतिनिधी या प्रकरणाचे फुकटचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत," अशी टीका त्यांनी केली.

शब्बीर नगरमध्ये २५ लाखांच्या रस्ते कामाचा शुभारंभ प्रभाग क्रमांक १९ मधील शब्बीर नगर परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्यांची समस्या होती. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. नागरिकांनी ही समस्या माजी आमदार फारुख शाह यांच्याकडे मांडल्यानंतर नगरविकास विभागाच्या मूलभूत सोयी-सुविधा योजनेतून २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. या निधीतून होणाऱ्या रस्ते कामाचा शुभारंभ फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आला. काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना दर्जेदार रस्ता उपलब्ध होईल, अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते रफिक शहा पठाण, माजी नगरसेवक सद्दाम खान, समीर खान, डॉ. दीपश्री नाईक, कैसर शहा, भिकन शाह, अजहर अली सय्यद यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. "मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच असून, राष्ट्रवादीच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे काम सुरू आहे. माझ्या एमआयएममध्ये जाण्याच्या केवळ अफवा पसरवल्या जात असून, हा विरोधकांचा मला बदनाम करण्याचा कुटील डाव आहे," असा स्पष्ट खुलासा माजी आमदार फारुख शाह यांनी केला.

# पाचोरा शहरातील अवैध सट्टा -पत्ता व इतर धंदे बंद करण्याची मागणी

## एकलव्य आदिवासी संघटनेचा आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा। (प्रतिनिधी):** पाचोरा शहरासह जारगाव चौफुली, नगरपालिका जिन, स्टेशन रोड, एम.एम. कॉलेज चौक, आठवडे बाजार परिसरात सुरू असल्याचा आरोप असलेले अवैध सट्टा-पत्ता व इतर अवैध धंदे तात्काळ बंद करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी एकलव्य आदिवासी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुधाकर आत्माराम वाघ यांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, शहरातील विविध भागांत अवैध सट्टा-पत्ता व इतर धंदे खुलेआम सुरू असल्याचा आरोप असून, त्यांच्यावर प्रभावी कारवाई होत नसल्याने संबंधितांचे मनोबल वाढत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. कष्टकऱ्यांच्या पैशांचे नुकसान होत असल्याचा आरोप सट्टा-पत्त्याच्या नादामुळे कष्टकरी, मजूर आणि सामान्य नागरिक दिवसभर मेहनत करून कमावलेला



पैसा गमावत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवत असून, युवकांचे भविष्य धोक्यात येत असल्याचेही संघटनेने म्हटले आहे. अवैध धंद्यांमुळे समाजात गुन्हेगारीला खतपाणी मिळण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. १५ ऑगस्टला आंदोलनाचा इशारा पाचोरा शहर व तालुक्यातील अवैध सट्टा-पत्ता तसेच इतर अवैध धंदे तात्काळ बंद न झाल्यास दि. १५ ऑगस्ट रोजी 'सट्टा-पत्ता खेलो आंदोलन' करण्यात येईल, असा इशारा एकलव्य आदिवासी संघटनेने दिला आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून अवैध धंद्यांविरोधातील जनआक्रोश व्यक्त करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.पाचोरा शहरासह जारगाव चौफुली, नगरपालिका जिन, स्टेशन रोड, एम.एम. कॉलेज चौक, आठवडे बाजार परिसरात सुरू असल्याचा आरोप असलेले अवैध सट्टा-पत्ता व इतर अवैध धंदे तात्काळ बंद करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी एकलव्य आदिवासी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुधाकर आत्माराम वाघ यांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली

# १० रुपये लिटरने गोमूत्र खरेदीचा पायलट प्रोजेक्ट सुरू!

जन सम्राट टाईम्स

**बुलंदशहर । प्रतिनिधी:** उत्तर प्रदेशातील बुलंदशहर जिल्ह्यात गोसंरक्षण, जैविक शेती आणि महिला सक्षमीकरणाला चालना देण्याच्या उद्देशाने एक अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. येथील स्याना तहसील परिसरातील नरसैना आणि जवळपासच्या १५ गावांमध्ये एफपीओ (FPO - किसान उत्पादक संघटना) च्या माध्यमातून १० रुपये प्रति लिटर दराने गोमूत्र खरेदीचा पायलट प्रोजेक्ट (प्रायोगिक प्रकल्प) सुरू करण्यात आला आहे. प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये:

* उत्पादनांचा वापर: संकलित केलेले गोमूत्र प्रक्रियेद्वारे जैविक खते, शेतीसाठी उपयुक्त औषधे आणि कीटकनाशके तयार करण्यासाठी वापरले जात आहे, ज्यामुळे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल.
* महिला सक्षमीकरण आणि रोजगार: या प्रकल्पाशी सुमारे ३०० महिलांना जोडण्यात



आले असून त्यांना शेअरहोल्डर बनवण्यात आले आहे. गोमूत्र संकलनात मदत करणाऱ्या महिलांना प्रति लिटर २ रुपये कमिशन दिले जात आहे, ज्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना हक्काचा रोजगार मिळाला आहे.
*सध्याचे संकलन: या प्रकल्पांतर्गत सध्या दररोज सुमारे ५०० लिटर गोमूत्राचे संकलन केले जात आहे.

भविष्यातील विस्तार: हा सध्या एक प्रायोगिक प्रकल्प (पायलट प्रोजेक्ट) म्हणून राबवला जात असून, या प्रकल्पाचे यश आणि शेतकऱ्यांचा प्रतिसाद पाहून हा उपक्रम उत्तर प्रदेशच्या इतर जिल्ह्यांमध्येही लागू केला जाण्याची शक्यता आहे. या योजनेमुळे पशुपालकांसाठी गोमूत्र देखील उत्पन्नाचे एक साधन बनत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळत आहे.

# नांदेडमध्ये अकाली दलाचे प्रमुख सुखबीर सिंह बादल यांच्यावर हल्ला!

## परिसरात खळबळ कृपाणाने हल्ल्याचा प्रयत्न

जन सम्राट टाईम्स

**नांदेड | प्रतिनिधी:** नांदेड येथील गुरुद्वारा परिसरात शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष आणि पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री Sukhbir Singh Badal यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे गुरुद्वारा परिसरात काही काळ खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, सुखबीर सिंह बादल हे नांदेड येथील गुरुद्वारा माता साहिब कौर येथे दर्शनासाठी गेले होते. दर्शनानंतर बाहेर पडत असताना एका व्यक्तीने त्यांच्यावर कृपाणाने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सुरक्षारक्षकांनी तातडीने हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला. सुरक्षा यंत्रणांची तत्काळ कारवाई हल्ल्याच्या प्रयत्नानंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी संशयिताला ताब्यात घेतले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिसरातील सुरक्षा व्यवस्था वाढवली. दरम्यान, या घटनेचा सखोल तपास सुरू असून हल्ल्यामागील नेमके कारण आणि आरोपीचा उद्देश तपासानंतर स्पष्ट होणार आहे. गुरुद्वारा परिसरात कडक बंदोबस्त घटनेनंतर नांदेड गुरुद्वारा परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीरसिंह बादल यांच्यावर नांदेड येथे झालेल्या हल्ल्याच्या घटनेची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड पोलीस अधीक्षक यांच्याकडून



माहिती घेतली आहे. या घटनेत आरोपीला तात्काळ अटक केली असून कोणत्या उद्देशाने हा हल्ला झाला, याची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.सुखबीर सिंह बादल यांची प्रकृती चांगली आहे, असल्याची माहिती देखील देण्यात आली आहे. पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीरसिंग बादल याच्यावर हल्ला करणारा व्यक्ती वकील आहे. आरोपी जसपालसिंग याचं वय 62 वर्ष आहे. तो मूळचा पुणे येथील आहे. जसपालसिंग पुणे न्यायालयात वकील होता. मागील 2 वर्षांपासून नांदेड जवळील मुगट येथील मातासाब गुरुद्वारात तो सेवा करत आहे. आज सुखबीरसिंग बादल मातासाब गुरुद्वारातुन दर्शन बाहेर पडताच जसपालसिंग यानं हल्ला केला.जसपालसिंग याला जागेवरूनच अटक करण्यात आलं असून पोलीस चौकशी सुरु आहे.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेसंदर्भात माहिती घेतली आहे. बादल यांच्यावर हल्ला करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. हल्लेखोरानं नेमक्या उद्देशानं हल्ला केला याची माहिती पोलिसांकडून घेतली जात आहे. देवेंद्र फडणवीस यांनी सुखबीर सिंह बादल यांच्यासोबत फोनवरुन चर्चा केली.

# दहिगावात संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत

## ग्रामपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या टोलवाटोलवीमुळे शेतकरी त्रस्त

जन सम्राट टाईम्स

**यावल | प्रतिनिधी :** तालुक्यातील दहिगाव आणि परिसरात मंगळवार, दि. ११ ऑगस्टपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सावखेडासिम रस्त्यालगत असलेल्या गुरांच्या गोठ्यांमध्ये पुन्हा पावसाचे पाणी शिरल्याने साठवून ठेवलेला चारा भिजून खराब झाला आहे. त्यामुळे पशुधनाच्या सुरक्षिततेसह शेतकऱ्यांसमोर चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, मागील अतिवृष्टीच्या काळातही याच ठिकाणी पाणी शिरले होते. वारंवार तक्रारी करूनही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. चारा भिजला; पशुधनासाठी कोरड्या जागेचा अभाव दहिगाव परिसरात पावसामुळे रस्ते, गल्लीबोळ आणि सखल भागात पाणी साचले आहे. सावखेडासिम रस्त्यालगतच्या गोठ्यांकडे जाणाऱ्या पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने पावसाचे पाणी थेट गोठ्यांमध्ये शिरत आहे. त्यामुळे सुका चारा भिजून खराब झाला असून, जनावरांना बांधण्यासाठी कोरडी जागाही उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. ग्रामपंचायत आणि PWD मध्ये टोलवाटोलवी या समस्येबाबत संबंधित शेतकऱ्यांनी यापूर्वी ग्रामपंचायत



तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी तक्रारी केल्या होत्या. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तडवी यांनी घटनास्थळी पाहणी केली होती. मात्र, संबंधित काम ग्रामपंचायतीच्या हद्दीत येत असल्याचे सांगण्यात आले. दुसरीकडे ग्रामपंचायतीकडून हा प्रश्न सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असल्याचे सांगितले जात असल्याने दोन्ही विभागांच्या टोलवाटोलवीत शेतकरी भरडले जात असल्याची नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. गटारींच्या चुकीच्या उतारामुळे पाणी गोठ्यांकडे? गटारींमधून वाहणाऱ्या पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने पाणी ओव्हरफ्लो होऊन परिसरात साचत आहे. गटारींचा उतार चुकीच्या पद्धतीने देण्यात आल्यामुळे पाणी वाहून जाण्याऐवजी गोठे आणि वस्तीच्या दिशेने वळत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. संबंधित गटारीची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी आणि पावसाच्या पाण्याचा कायमस्वरूपी निचरा होण्यासाठी व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

डासांचा उपद्रव वाढला; आजारांचा धोका साचलेल्या पाण्यामुळे परिसरात डासांचा उपद्रव वाढला असून दुर्गंधीही पसरली आहे.तालुक्यातील दहिगाव आणि परिसरात मंगळवार, दि. ११ ऑगस्टपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सावखेडासिम रस्त्यालगत असलेल्या गुरांच्या गोठ्यांमध्ये पुन्हा पावसाचे पाणी शिरल्याने साठवून ठेवलेला चारा भिजून खराब झाला आहे. त्यामुळे पशुधनाच्या सुरक्षिततेसह शेतकऱ्यांसमोर चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे साथीचे आजार पसरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने साचलेले पाणी तातडीने काढून परिसराची स्वच्छता करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. सुरेश आबानगरला तलावाचे स्वरूप दरम्यान, दहिगावातील सुरेश आबानगर परिसरातही मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने अक्षरशः तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. दरवर्षी तात्पुरत्या उपाययोजना करण्याऐवजी ग्रामपंचायत आणि संबंधित विभागांनी संयुक्त पाहणी करून पाणी निचऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# स्वातंत्र्याच्या 79 वर्षांनंतरही मानसिक गुलामगिरीच्या विळख्यात समाज? व्यवस्थेसह मानसिकतेवर प्रश्नचिन्ह

## राजकीय अंधभक्ती, जातीयता, अंधश्रद्धा आणि डिजिटल व्यसनातून वैचारिक स्वातंत्र्याचा शोध

जन सम्राट टाईम्स

**नागपूर | प्रतिनिधी :** १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने ब्रिटिश राजवटीच्या शृंखला तोडून स्वातंत्र्य मिळवले. स्वतःचा राष्ट्रध्वज, संविधान, लोकशाही व्यवस्था आणि सार्वभौम राष्ट्र म्हणून भारताने प्रदीर्घ वाटचाल केली. मात्र, २०२६ मध्ये देशाच्या सामाजिक आणि वैचारिक स्थितीकडे पाहताना एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो—शारीरिक स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजाला खरे वैचारिक आणि मानसिक स्वातंत्र्य मिळाले आहे का? राजकीय अंधभक्ती, जातीयता, धार्मिक ध्रुवीकरण, सामाजिक रूढी, महापुरुषांचे जातीय विभाजन आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाचा विचार केला, तर मानसिक स्वातंत्र्याचा प्रश्न आजही तितकाच महत्त्वाचा असल्याचे जाणवते. लोकशाहीत नागरिक मालक की पक्षाचा अनुयायी? लोकशाही व्यवस्थेत जनता ही सर्वोच्च असते. लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारणे, त्यांच्या कामाचे मूल्यमापन करणे आणि योग्य-अयोग्य बाबींवर मत व्यक्त करणे हा नागरिकांचा अधिकार आहे. मात्र, राजकीय पक्ष आणि नेत्यांविषयीची अंधभक्ती वाढत गेल्यास विवेकपूर्ण प्रश्न विचारण्याची प्रवृत्ती कमी होण्याचा धोका निर्माण होतो. बेरोजगारी, महागाई, शिक्षण, आरोग्य, शेती आणि रोजगार यांसारख्या मूलभूत प्रश्नांऐवजी भावनिक आणि विभाजनकारी मुद्द्यांवर समाजाचे लक्ष केंद्रित होत असेल, तर लोकशाहीच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. नेता कोणत्याही पक्षाचा असो, त्याला प्रश्न विचारण्याची आणि त्याच्या कामाचे परीक्षण करण्याची सवय लोकशाहीसाठी आवश्यक आहे. न्यायव्यवस्थेबाबत समानतेची भावना आवश्यक "कायद्यासमोर सर्व समान आहेत" हे संविधानातील मूलभूत तत्त्व आहे. मात्र, आर्थिक आणि सामाजिक विषमतेमुळे न्याय मिळवण्याच्या प्रक्रियेत सामान्य नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, अशी भावना समाजात निर्माण झाली आहे. महागडे कायदेशीर पर्याय परवडणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींमध्ये मोठी तफावत असू शकते. त्यामुळे सुलभ, जलद आणि सर्वांसाठी समान न्यायव्यवस्था ही लोकशाहीची गरज



आहे. महिलांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न भारतीय संस्कृतीत महिलांना देवीचे स्थान दिले जाते; मात्र प्रत्यक्ष सामाजिक जीवनात त्यांना अनेक रूढी, परंपरा आणि सामाजिक अपेक्षांचा सामना करावा लागतो. व्रत-वैकल्ये, कौटुंबिक परंपरा किंवा धार्मिक समजुती यांचे पालन करणे ही व्यक्तीची श्रद्धा असू शकते. मात्र, भीती, दबाव किंवा बळजबरीच्या माध्यमातून महिलांच्या निर्णयस्वातंत्र्यावर मर्यादा आणणे ही चिंतेची बाब आहे. महिलांना शिक्षण, आरोग्य, रोजगार, मालमत्ता आणि निर्णयप्रक्रियेत समान अधिकार मिळणे हे खऱ्या स्वातंत्र्याचे महत्त्वाचे लक्षण आहे. महापुरुषांना जातीच्या चौकटीत कोंडण्याचे आव्हान छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महापुरुषांचे कार्य विशिष्ट जातीपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी समाजातील व्यापक परिवर्तनासाठी संघर्ष केला. मात्र, आज त्यांच्या विचारांपेक्षा त्यांच्या जातीय ओळखीवर अधिक भर दिला जात असल्याचे चित्र अनेकदा दिसते. महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करण्याबरोबरच त्यांच्या विचारांचे आचरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. तंत्रज्ञानाच्या युगातील नवी मानसिक गुलामगिरी आजच्या तरुणांच्या हातात स्मार्टफोन आहे, जगभरातील माहिती काही सेकंदांत उपलब्ध आहे; परंतु त्याच वेळी सोशल मीडिया आणि डिजिटल मनोरंजनाचे व्यसन हे नवे आव्हान बनले आहे. रिल्स, लाईक्स, कमेंट्स आणि व्हायरल होण्याच्या स्पर्धेत वेळ घालवताना वाचन, सखोल अभ्यास, कौशल्यविकास आणि मैदानी उपक्रमांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे. सोशल मीडियावरील माहितीची सत्यता तपासण्याऐवजी केवळ फॉरवर्ड मेसेजवर विश्वास ठेवणेही धोकादायक ठरू शकते. तंत्रज्ञान हे साधन आहे; ते आपल्या विचारांवर नियंत्रण ठेवणारे माध्यम बनू नये, ही काळाची गरज आहे. खरे स्वातंत्र्य कधी मिळेल? खरे वैचारिक स्वातंत्र्य तेव्हा अधिक अर्थपूर्ण ठरेल— जेव्हा आपण कोणत्याही नेत्याची अंधभक्ती न करता त्याला विकास, रोजगार आणि जनहिताच्या प्रश्नांवर जाब विचारू. जेव्हा आर्थिक परिस्थिती कोणतीही असो, प्रत्येक नागरिकाला न्याय मिळवण्याची समान संधी उपलब्ध होईल. जेव्हा महिलांना भीती आणि सामाजिक दबावापासून मुक्त होऊन स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळेल. जेव्हा महापुरुषांना जात-धर्माच्या चौकटीत न अडकवता त्यांच्या समतेच्या आणि मानवतावादी विचारांचा स्वीकार केला जाईल. जेव्हा तरुण सोशल मीडियाचा विवेकपूर्ण वापर करून ज्ञान, कौशल्य आणि राष्ट्रनिर्मितीकडे अधिक लक्ष देतील. स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्तता नव्हे; तर स्वतःच्या विचारांना प्रश्न विचारण्याचे, सत्य स्वीकारण्याचे आणि चुकीच्या गोष्टींविरोधात उभे राहण्याचे धैर्यही होय. भारताने १९४७ मध्ये राजकीय स्वातंत्र्य मिळवले.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## आरक्षण उपवर्गीकरणा विरोधात भीमसैनिकांची एकजूट

### शेकडो समाजबांधवांची बैठक



जन सम्राट टाईम्स

**मुक्ताईनगर | प्रतिनिधी:** अनुसूचित जाती (SC) आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून मुक्ताईनगर तालुक्यातील बौद्ध समाजबांधव आणि भीमसैनिकांमध्ये तीव्र असंतोष व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर बुधवार, १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता शासकीय विश्रामगृह, मुक्ताईनगर येथे आरक्षण उपवर्गीकरण विरोधी मोर्चाच्या नियोजनासाठी महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. तालुक्याच्या विविध भागांतून शेकडो भीमसैनिक व समाजबांधव या बैठकीस उपस्थित होते. आरक्षणाच्या उपवर्गीकरणाला विरोध दर्शवत आगामी महिनाभरात मुक्ताईनगर तालुक्यात हजारोंच्या उपस्थितीत भव्य मोर्चा काढण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. मोर्चाची व्यापकता वाढवण्यासाठी तालुक्यातील प्रत्येक गाव, वाडी-वस्ती तसेच समाजबांधवांपर्यंत पोहोचून जनजागृती करण्यावर भर देण्यात आला. मोर्चाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा बैठकीत मोर्चासाठी आवश्यक जनसंपर्क, प्रसिद्धी, गावनिहाय बैठका, वाहतूक व्यवस्था, शिस्त आणि नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित समाजबांधवांना आपली मते आणि सूचना मांडण्याची संधी देण्यात आली. मोर्चा केवळ मर्यादित स्वरूपात न राहता तालुक्यातील हजारो समाजबांधवांच्या सहभागातून विराट स्वरूपात काढण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. त्यासाठी गावागावात संपर्क मोहीम सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले. कृती समितीसह विविध समित्या स्थापन करण्याचे नियोजन मोर्चाच्या प्रभावी आयोजनासाठी आरक्षण उपवर्गीकरण विरोधी मोर्चा कृती समिती स्थापन करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच जनसंपर्क, प्रसिद्धी, वाहतूक, शिस्त, आर्थिक नियोजन आणि गावनिहाय संपर्कासाठी स्वतंत्र समित्या स्थापन करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. मोर्चाची तारीख, मार्ग, प्रमुख मागण्या, सहभागी संघटना तसेच इतर प्रशासकीय बाबींची अंतिम निश्चिती आगामी बैठकीत करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. गावागावात जनजागृती मोहीम आरक्षण उपवर्गीकरणाच्या मुद्द्याबाबत समाजबांधवांमध्ये जनजागृती करण्यासाठी गावनिहाय बैठका आणि संपर्क अभियान राबविण्यावर विशेष भर देण्यात आला. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या परिसरातील समाजबांधवांशी संवाद साधून मोर्चाची भूमिका आणि उद्देश पोहोचवावा, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, या मुद्द्यावर मुक्ताईनगर तालुक्यात भीमसैनिकांची एकजूट होत असून, आगामी काळात आंदोलनाला व्यापक स्वरूप देण्याची तयारी सुरू झाली आहे.

---

## भुसावळ रेल्वे स्थानकावर स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणांचे मॉकड्रिल!

### RPF, ATS, BDDS आणि श्वान पथकाचा सहभाग!

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी:** येत्या १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर भुसावळ रेल्वे स्थानकावरील सुरक्षा व्यवस्था अधिक सतर्क करण्यात आली आहे. प्रवाशांची सुरक्षितता आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तातडीने सामोरे जाण्याची तयारी तपासण्यासाठी रेल्वे स्थानकावर विशेष मॉकड्रिल घेण्यात आली. या मॉकड्रिलमध्ये लोहमार्ग पोलीस, रेल्वे सुरक्षा दल (RPF), दहशतवादविरोधी पथक (ATS), बॉम्ब शोधक व नाशक पथक (BDDS) तसेच श्वान पथकाने सहभाग घेतला. संभाव्य दहशतवादी धोका किंवा संशयास्पद वस्तू आढळल्यास विविध सुरक्षा यंत्रणांनी समन्वयाने कशा पद्धतीने कारवाई करावी, याची प्रत्यक्ष रंगीत तालीम यावेळी करण्यात आली. आपत्कालीन प्रतिसाद क्षमतेची चाचणी राष्ट्रीय सणाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी



होण्याची शक्यता असते. अशा वेळी कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्वरित प्रतिसाद, परिसर सुरक्षित करणे, संशयास्पद वस्तूची तपासणी आणि प्रवाशांना सुरक्षित ठिकाणी हलविणे यांसारख्या बाबींची तयारी तपासण्यात आली. विविध सुरक्षा यंत्रणांमध्ये समन्वय राखून कारवाई करण्याच्या क्षमतेचेही या मॉकड्रिलदरम्यान प्रात्यक्षिक करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर भुसावळ रेल्वे स्थानकाची सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात आल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले. येत्या १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर भुसावळ रेल्वे स्थानकावरील सुरक्षा व्यवस्था अधिक सतर्क करण्यात आली आहे. प्रवाशांची सुरक्षितता आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तातडीने सामोरे जाण्याची तयारी तपासण्यासाठी रेल्वे स्थानकावर विशेष मॉकड्रिल घेण्यात आली. या मॉकड्रिलमध्ये लोहमार्ग पोलीस, रेल्वे सुरक्षा दल (RPF), दहशतवादविरोधी पथक (ATS), बॉम्ब शोधक व नाशक पथक (BDDS) तसेच श्वान पथकाने सहभाग घेतला. संभाव्य दहशतवादी धोका किंवा संशयास्पद वस्तू आढळल्यास विविध सुरक्षा यंत्रणांनी समन्वयाने कशा पद्धतीने कारवाई करावी.

---

## भवरखेडेत दारूबंदीसाठी महिलांचा एल्गार; ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव मंजूर!

### अवैध दारूविक्रीमुळे सामाजिक समस्या वाढल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स



**भवरखेडे| प्रतिनिधी:** गावातील अवैध दारूविक्रीला आळा घालून दारूबंदी लागू करण्यात यावी, या मागणीसाठी भवरखेडे येथील महिलांनी एकजूट दाखवत एल्गार पुकारला. दि. १३ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या ग्रामसभेत महिलांनी दारूबंदीच्या मागणीसाठी आक्रमक भूमिका घेतली. यावेळी ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव मंजूर करण्यात आला. गावातील अवैध दारूविक्रीमुळे कुटुंबातील वाद, सामाजिक समस्या आणि तरुण पिढीवर होणारे दुष्परिणाम वाढत असल्याची चिंता महिलांसह ग्रामस्थांनी व्यक्त केली. गावातील शांतता आणि सामाजिक वातावरण अबाधित ठेवण्यासाठी दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. ग्रामसभेत ठराव क्र. ३ मंजूर दारूबंदीच्या मागणीसंदर्भात ग्रामसेवक सी. एन. सोनवणे यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर गावात दारूबंदी लागू करण्याबाबतचा ठराव क्र.३ ग्रामसभेत मंजूर करण्यात आला. पोलीस व दारूबंदी विभागाकडे निवेदन देणार पुढील कायदेशीर व प्रशासकीय कार्यवाहीसाठी भवरखेडे ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य तसेच महिला यांच्या वतीने धरणगाव पोलीस स्टेशन, पोलीस अधीक्षक कार्यालय जळगाव आणि दारूबंदी विभाग जळगाव यांच्याकडे निवेदन सादर करण्यात येणार आहे. अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि गावात दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी महिलांनी केली आहे. महिलांच्या भूमिकेमुळे दारूबंदीचा मुद्दा ऐरणीवर दारूबंदीच्या मागणीसाठी महिलांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे भवरखेडे गावातील दारूबंदीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ग्रामसभेतील ठरावानंतर प्रशासन याबाबत कोणती कार्यवाही करते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. गावातील अवैध दारूविक्रीला आळा घालून दारूबंदी लागू करण्यात यावी, या मागणीसाठी भवरखेडे येथील महिलांनी एकजूट दाखवत एल्गार पुकारला. दि. १३ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या ग्रामसभेत महिलांनी दारूबंदीच्या मागणीसाठी आक्रमक भूमिका घेतली. यावेळी ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव मंजूर करण्यात आला. गावातील अवैध दारूविक्रीमुळे कुटुंबातील वाद, सामाजिक समस्या आणि तरुण पिढीवर होणारे दुष्परिणाम वाढत असल्याची चिंता महिलांसह ग्रामस्थांनी व्यक्त केली.

---

## कोळन्हावी जवळील तापी पुलावरून २९ वर्षीय तरुणाची नदीत उडी!

### शोधमोहीम सुरू; दुचाकी, मोबाईल व पाकीट पुलावर ठेवून उडी; उडी घेण्यापूर्वी बहिणीला केला फोन

जन सम्राट टाईम्स

**यावल | प्रतिनिधी:** किनगाव येथून जळगावकडे जात असलेल्या २९ वर्षीय तरुणाने कोळन्हावी जवळील तापी नदीच्या पुलावरून नदीपात्रात उडी घेतल्याची धक्कादायक घटना बुधवारी घडली. नीलेश मधुकर धनगर (वय २९, रा. किनगाव खुर्द, ता. यावल) असे संबंधित तरुणाचे नाव आहे. घटनेनंतर तापी नदीपात्रात त्याचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली आहे. पुलावर दुचाकी, मोबाईल आणि पाकीट ठेवले मिळालेल्या माहितीनुसार, नीलेश धनगर बुधवारी काही कामानिमित्त किनगाव येथून जळगावकडे निघाला होता. कोळन्हावी जवळील तापी नदीच्या पुलावर आल्यानंतर त्याने आपली दुचाकी पुलाच्या कडेला उभी केली. त्यानंतर मोबाईल आणि पाकीट दुचाकीवरच ठेवून त्याने नदीपात्रात उडी घेतल्याचे सांगण्यात येत आहे. उडी घेण्यापूर्वी बहिणीला केला फोन नदीत उडी घेण्यापूर्वी नीलेशने आपल्या बहिणीला फोन केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येत आहे. पुलावर दुचाकी बेवारस स्थितीत आढळून



आल्यानंतर आणि त्यावर मोबाईल व पाकीट दिसल्याने स्थानिकांच्या ही बाब निदर्शनास आली. यावल पोलिसांकडून शोधमोहीम घटनेची माहिती मिळताच यावल पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. किनगाव येथून जळगावकडे जात असलेल्या २९ वर्षीय तरुणाने कोळन्हावी जवळील तापी नदीच्या पुलावरून नदीपात्रात उडी घेतल्याची धक्कादायक घटना बुधवारी घडली. नीलेश मधुकर धनगर (वय २९, रा. किनगाव खुर्द, ता. यावल) असे संबंधित तरुणाचे नाव आहे. घटनेनंतर तापी नदीपात्रात त्याचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली आहे.स्थानिक मच्छीमार आणि आपत्कालीन पथकाच्या मदतीने तापी नदीपात्रात नीलेशचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. नीलेशने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

---

## बजाज ऑटोसामोर विद्यार्थ्यांचे 'काम बंद' आंदोलन

### 'कमवा आणि शिका' योजनेत तीन वर्षे काम करूनही पदवी प्रमाणपत्र मिळाले नसल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी:** वाळूज एमआयडीसी येथील प्रसिद्ध बजाज ऑटो कंपनीसमोर शुक्रवारी हजारो प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी अचानक 'काम बंद' आंदोलन करत जोरदार निदर्शने केली. 'कमवा आणि शिका' (EARN AND LEARN) योजनेअंतर्गत तीन वर्षे काम करून घेतल्यानंतरही आश्वासन दिलेली पदवी किंवा पदविका अद्याप मिळाली नसल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. तीन वर्षे काम, मात्र पदवीची प्रतीक्षा मिळालेल्या माहितीनुसार, बजाज ऑटो कंपनीमध्ये 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत दरवर्षी शेकडो तरुण-तरुणींना तीन



वर्षांच्या करारावर प्रशिक्षणार्थी म्हणून संधी दिली जाते. कामासोबतच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शिक्षण पूर्ण करून पदवी किंवा पदविका मिळवून देण्याचे आश्वासन दिले जात असल्याचे आंदोलक विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. मात्र, तीन वर्षांचा कालावधी पूर्ण होऊनही अनेक विद्यार्थ्यांना संबंधित विद्यापीठ किंवा संस्थेकडून पदवी प्रमाणपत्र मिळालेले नाही. शैक्षणिक प्रवेश आणि प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत कंपनी व व्यवस्थापनाकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या आंदोलक विद्यार्थ्यांनी पुढील तीन वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना तातडीने अधिकृत पदवी प्रमाणपत्र देण्यात यावे. शैक्षणिक प्रवेशाबाबतची अनिश्चितता दूर करण्यात यावी. तीन वर्षे काम करून घेतल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक हक्कांबाबत होणारा विलंब थांबवावा. ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा विद्यार्थ्यांच्या अचानक झालेल्या काम बंद आंदोलनामुळे कंपनी प्रशासनाची धावपळ उडाली. आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाने आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांचा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले. मात्र, ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे. त्यामुळे आता कंपनी प्रशासन आणि संबंधित शैक्षणिक संस्थांकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. वाळूज एमआयडीसी येथील प्रसिद्ध बजाज ऑटो कंपनीसमोर शुक्रवारी हजारो प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी अचानक 'काम बंद' आंदोलन करत जोरदार निदर्शने केली. 'कमवा आणि शिका' (EARN AND LEARN) योजनेअंतर्गत तीन वर्षे काम करून घेतल्यानंतरही आश्वासन दिलेली पदवी किंवा पदविका अद्याप मिळाली नसल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. तीन वर्षे काम, मात्र पदवीची प्रतीक्षा मिळालेल्या माहितीनुसार, बजाज ऑटो कंपनीमध्ये 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत दरवर्षी शेकडो तरुण-तरुणींना तीन वर्षांच्या करारावर प्रशिक्षणार्थी म्हणून संधी दिली जाते. कामासोबतच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शिक्षण पूर्ण करून पदवी किंवा पदविका मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

---

## जीर्ण पुलामुळे विद्यार्थी आणि ग्रामस्थांचे हाल!

जन सम्राट टाईम्स

**गोंदिया। प्रतिनिधी:** गोंदिया जिल्ह्यातील बोंडगावदेवी–खांबी मार्गावरील जीर्ण आणि धोकादायक पुलामुळे परिसरातील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. पुलाची दुरवस्था झाल्याने सुरक्षेच्या कारणास्तव गेल्या महिनाभरापासून या मार्गावरील एसटी बससेवा बंद करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामानिमित्त प्रवास करणाऱ्या ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चिमुकली विद्यार्थिनीने मांडली व्यथा या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी एका शाळकरी विद्यार्थिनीने थेट पुलावर उभे राहून व्हिडिओच्या माध्यमातून आपली



व्यथा मांडली. पुलाच्या दुरवस्थेमुळे विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, याकडे तिने प्रशासनाचे लक्ष वेधले. या विद्यार्थिनीचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्यानंतर पुलाच्या दुरवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.